# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

धरती आबा म्हणून ओळखले जाणारे आदिवासी नेते आणि स्वातंत्र्यसेनानी भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आज देशभरात आदिवासी गौरव दिवस म्हणून साजरी होत आहे. यानिमित्त मुख्य कार्यक्रम बिहारमधल्या जमुई इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पार पडला. बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्ष सोहळ्याची सुरुवात यावेळी करण्यात आली, तसंच भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मरणार्थ एका नाण्याचं आणि टपाल तिकिटाचं अनावरण पंतप्रधानांच्या हस्ते झालं. ग्रामीण आणि दुर्गम भागातल्या आदिवासी समुदायांच्या विकासासाठी सहा हजार ६४० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पाचं उद्घाटन आणि पायाभरणी देखील पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली.

नवी दिल्लीतल्या बांसेरा उद्यानात भागवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचं अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झालं.

****

पहिल्या बोडोलँड महोत्सवाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत उद्घाटन होणार आहे. केवळ बोडोलँड मध्येच नाही तर आसाम, पश्चिम बंगाल, नेपाळ आणि ईशान्येकडील सीमावर्ती भागात राहणाऱ्या स्थानिक बोडो लोकांना एकत्रित करणं हे या महोत्सवाचं उद्दीष्ट आहे. समृद्ध भारतासाठी शांतता आणि एकता अशी या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

****

शिख धर्माचे संस्थापक, पहिले गुरु, गुरु नानक यांची ५५५ वी जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त नांदेडच्या श्री सचखंड गुरुद्वारासह विविध गुरुद्वाऱ्यांमध्ये भजन, किर्तनासह धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरु नानक यांच्या प्रकाश पर्वानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

गुरु नानकजी यांची प्रेम, विश्वास, सत्य आणि त्यागाची शिकवण सर्वांना नैतिकतेबद्दल मार्गदर्शन करते, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही गुरुनानक जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांच्या जीवन चरित्रातून समानता, करुणा आणि मानवतेच्या सेवेविषयी प्रेरणा मिळते, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

आज कार्तिकी पौर्णिमा देखील आहे; त्यामुळे राज्यात ठिकठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

राज्यात विधानसभा प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. सर्वच पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांचे झंझावाती प्रचार दौरे सुरु आहेत. ठिकठिकाणचे उमेदवार आणि कार्यकर्ते कोपरा सभा, मेळावे, प्रचार फेऱ्या आणि घरोघरी मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी घेत आहेत.

भाजप नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज हिंगोली, उमरखेड आणि चंद्रपूर इथं जाहीर सभा घेणार आहेत. शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुक्यातल्या बारड इथं, भोकर विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार श्रीजया चव्हाण यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आज गडचिरोली आणि चंद्रपूर इथं सभेला संबोधित करणार आहेत.

****

विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

****

लातूर जिल्ह्यातल्या निलंगा विधानसभा मतदारसंघात कालपासून गृह मतदानाला सुरुवात झाली. यावेळी सामान्य निवडणूक निरीक्षक लक्ष्मीकांत प्यारेलाल प्रधान यांनी प्रत्यक्ष भेट देवून या प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी त्यांनी आयटीआय इथल्या सुरक्षा कक्षाला देखील भेट दिली.

दरम्यान, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या मतदान प्रकियेतले मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी आणि इतर मतदान अधिकाऱ्यांचं दुसरं प्रशिक्षण काल दयानंद महाविद्यालयात पार पडलं. यावेळी अधिकाऱ्यांना ईव्हीएम हताळणीचं प्रशिक्षण देण्यात आलं.

****

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी- पुसद रस्त्यावर झरा फाटा इथं भाविकांची क्रुझर जीप उभ्या असलेल्या उसाच्या ट्रॉलीला धडकून झालेल्या अपघातात १३ भाविक जखमी झाले. औंढा तालुक्यातले राजदरी, पिंपळदरी इथले भाविक वर्धा इथल्या टाकळघाट इथं देवदर्शनासाठी जात असताना आज सकाळी हा अपघात झाला. अपघातातील सात जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यातल्या तिघांना नांदेड आणि चार रुग्णांना हिंगोली इथं उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

****

नांदेड जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ निळकंठ भोसीकर, यांच्या मार्गदर्शनाखाली काल "जागतिक मधुमेह दिन" साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना तज्ञ डॉक्टरांमार्फत मार्गदर्शन करण्यात आलं.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या नळदुर्ग इथं अवैधरित्या गुटखा आणि पान मसाला विक्री करणाऱ्यावर पोलीसांनी कारवाई केली. छापा टाकून केलेल्या या कारवाईत एकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान सुरु असलेल्या टी - ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला चौथा आणि शेवटचा सामना आज जोहान्सबर्ग इथं खेळला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल. या मालिकेत भारत दोन - एकनं आघाडीवर आहे.

****